## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

## वाशिम जिल्हयातील नगरपरिषदांमध्ये राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणे करीता जाहिरात

**जाहीरात क्र.कक्ष-१३/अका (नपाप्र)/कावि- १३८१/२०१२ दिनांक २१/१२/२०१२**

मा. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्र. नपप्रसं. कक्ष-५/संवर्ग/श्रेणी-क/वाशिम/सरळसेवा/२०११ दिनांक ११/०४/२०११ अन्वये वाशिम जिल्हयातील नगर परिषदामधील राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणी-क व श्रेणी-क-२ मधील रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. त्यानुसार ईच्छुक व पात्र उमेदवारांकडुन सदर जाहिरातीद्वारे फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरची लेखी परिक्षा OMR पध्दतीने घेण्यात येत आहे. पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम खालील प्रमाणे आहे. रिक्त पदे भरतीचा कालबध्द कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

**कार्यालयाचे नांव :- जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम**
**एकुण रिक्त पदे :- २० पदे**

| | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख | दि. ०५/०१/२०१३ रोजी (सायंकाळी ५.४५ पर्यत) |
| पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व ऑन लाईन प्रवेशपत्र निर्गमित करणे. | दि. ०५/०१/२०१३ रोजी |
| ओळखपत्र निर्गमित करणे (ऑन लाईन) | दि. ०८/०१/२०१३ रोजी पासुन |
| लेखी परीक्षेचा दिनांक | दि. १३/०१/२०१३ रोजी सकाळी ११.०० ते १.०० पर्यत |
| लेखी परिक्षेचा निकाल जाहिर करणे | दि. १४/०१/२०१३ रोजी |

**(१) संवर्गनिहाय रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

**(अ) अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) श्रेणी क**
**वेतन श्रेणी** - रुपये ९३००-३४८००/- ग्रेड पे-४२००/-

| भरावयाची एकुण पदे | प्रवर्ग | पदे | समातंर आरक्षण | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरीक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ पदे | | | भुकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालीन उमे. | मा.सैनिक | महिला | |
| | अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | १ | ० |
| | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | विजा/भज | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकुण** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **२** |

**(ब) अभियांत्रिकी सेवा (विद्युत) श्रेणी क**
**वेतन श्रेणी** - रुपये ९३००-३४८००/- ग्रेड पे-४२००/-

| भरावयाची एकुण पदे | प्रवर्ग | पदे | समातंर आरक्षण | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरीक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ पदे | | | भुकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालीन उमे. | मा.सैनिक | महिला | |
| | अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | खुला | २ | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | **एकुण** | **४** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **३** |

**(क) अभियांत्रिकी सेवा (संगणक) श्रेणी क**
**वेतन श्रेणी** - रुपये ९३००-३४८००/- ग्रेड पे-४२००/-

| भरावयाची एकुण पदे | प्रवर्ग | पदे | समातंर आरक्षण | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरीक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ पदे | | | भुकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालीन उमे. | मा.सैनिक | महिला | |
| | अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | १ | ० |
| | खुला | २ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | **एकुण** | **४** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **३** |

**(ड) जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा श्रेणी क**
**वेतन श्रेणी** - रुपये ९३००-३४८००/- ग्रेड पे-४२००/-

| भरावयाची एकुण पदे | प्रवर्ग | पदे | समातंर आरक्षण | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरीक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ पदे | | | भुकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालीन उमे. | मा.सैनिक | महिला | |
| | अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | विजा/भज | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | खुला | ३ | ० | ० | १ | ० | १ | १ |
| | **एकुण** | **६** | **०** | **०** | **१** | **०** | **१** | **४** |

## (इ) लेखा व लेखा परिक्षण सेवा श्रेणी क

**वेतन श्रेणी** - रुपये ९३००-३४८००/- ग्रेड पे-४२००/-

| भरावयाची एकुण पदे | प्रवर्ग | पदे | समातंर आरक्षण | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरीक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ पदे | | | भुकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालीन उमे. | मा.सैनिक | महिला | |
| | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकुण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |

## (फ) अग्निशमन सेवा श्रेणी क-२

**वेतन श्रेणी** - रुपये ५२००-२०२००/- ग्रेड पे-२८००/-

| भरावयाची एकुण पदे | प्रवर्ग | पदे | समातंर आरक्षण | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरीक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ पदे | | | भुकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालीन उमे. | मा.सैनिक | महिला | |
| | अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकुण** | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |

टिप :- समांतर आरक्षणसंदर्भात दर्शविणेत आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकूण पदापैकी आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेवाराद्वारे सदरचे पद भरले जाईल.

## (२) संवर्ग निहाय पदाची शैक्षणिक व इतर आवश्यक अर्हता.

खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता जाहिरातीचे दिनांकास प्रमाणपत्रासहीत पुर्ण करणे आवश्यक आहे.

### (अ) अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य)

(i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (बी.ई. सिव्हील) किंवा पदविका (डि.ई.सिव्हील) आवश्यक.

(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.

(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

### (ब) अभियांत्रिकी सेवा (विद्युत)

(i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी (बी.ई. विद्युत) किंवा पदविका (डि.ई.विद्युत) आवश्यक.

(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.

(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

**(क) अभियांत्रिकी सेवा (संगणक)**

(i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (बी.ई. संगणक) किंवा पदविका (डि.ई. संगणक) आवश्यक.

(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.

(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

**(ड) जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा श्रेणी क**

(i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी / पर्यावरण अभियांत्रिकी पदवी (B.E.Mechanical/Environmental) किंवा यांत्रिकी/पर्यावरण पदविका D.E.Mechanical/Environmental) आवश्यक किंवा शासनमान्य विद्यापीठाची पर्यावरण विज्ञान (Environmental Science) या विषयातील पदव्युत्तर पदविका आवश्यक.

(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.

(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

**(इ) लेखा व लेखा परिक्षण सेवा श्रेणी क**

(i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी आणि Member of Institution of Cost and Works Accounts (I.C.W.A.) किंवा सनदी लेखापाल (Chartered Accountant) असणे आवश्यक.

(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.

(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

**(फ) अग्निशमन सेवा श्रेणी क-२**

(i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.

(ii) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम (Sub Officers Course) उत्तीर्ण असणे आवश्यक.

(iii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.

(iv) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

**(३) सर्वसामान्य अटी :-**

(१) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक पात्रते बाबत कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तथापी ऑन लाईन अर्जामध्ये पुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काहि त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवारांची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

(२) उमेदवाराची लेखी परीक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्याने या परीक्षेत मिळालेल्या गुणांचे आधारे उमेदवाराला निवडी बाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतीम निवड केली जाईल.

**(४) वयोमर्यादा** :-

१. वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे वय जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास किमान १८ वर्षापेक्षा कमी नसावे व खुल्या प्रवर्गातील अर्जदाराचे कमाल वय ३३ वर्षा पेक्षा जास्त नसावे आणि मागासवर्गीय प्रवर्गातील अर्जदाराचे कमाल वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२. माजी सैनिक प्रवर्गातून अर्ज करणा-या माजी सैनिक अर्जदारासाठी शासन सा.प्र.वि.निर्णय दिनांक १०/१०/१९८० व परिपत्रक दिनांक १६/४/१९८१ नुसार माजी सैनिक उमेदवाराच्या एकुण सैनिकी सेवेचा कालावधी अधिक तीन वर्ष असा कालावधी त्यांच्या दिनांक ०५.०१.२०१३ रोजीच्या वयातून वजा करुन जर त्यांचे वय ३८ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी भरत असेल तरच ते नियूक्तीस पात्र ठरतील. सैनिक सेवेत असतांना अपंगत्व प्राप्त झालेल्या माजी सैनिकाना कमाल वयोमर्यादा वय ४५ वर्षे पर्यंत लागू राहील. वीर गती प्राप्त झालेल्या व कायम स्वरुपी जायबंदी झालेल्या माजी सैनिकाचे अवलबिंत याना सर्वसाधारण उमेदवाराना लागू असलेली वयाची अर्हता लागू राहील.

३. पदविधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारासाठी अर्जदाराचे वय दिनांक ०५.०१.२०१३ रोजी किमान १८ वर्षे पेक्षा कमी नसावे व कमाल वय ४६ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

४. स्वातंत्र सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, १९९१ चे जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. या घटकातील मागसवर्गीय उमेदवारासाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

५. अपंग उमेदवारांचे बाबतीत उच्चत्तम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहिल. अपंग प्रवर्गातील उमेदवांराचे किमान अपंगत्वाचे प्रमाण ४०% असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झालेनंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापुर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल, असे प्रमाणपत्र दिले नंतरच त्यांची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.

**(५) इतर अटि :-**

(१) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अंतीम निवड झाल्यानंतर सबंधीत नियुक्ती प्राधिका-याकडे अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(२) नियुक्ती पुर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास अद्यावत नॉन क्रिमीलियर दाखला तसेच आवश्यक ती कागदपत्रे / सांक्षाकित प्रमाणपत्राची छाननी संबधीत नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. मुळ कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतरच अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती देण्यात येणार नाही.

(३) उमेदवारांचे लेखी परीक्षेचे ठिकाण वाशिम शहर हे राहील. लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा संकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इ. तपशिल उमेदवारांना संकेत स्थळावर उपलब्ध राहील. परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील.

(४) लेखी परीक्षेसाठी उमेदवारास परीक्षा केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल.

(५) अंशकालीन उमेदवाराचे बाबतीत त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य योजने अंतर्गत कोणत्याही शासकिय कार्यालयाामध्ये सलग सेवा ३ वर्षापर्यत दरमहा मानधनावर काम केलेले असले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारास मुलाखतीचे / नियुक्तीचे वेळी सादर करावे लागेल.

(६) विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकिय/निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावेत.

(७) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. बीसीसी २०११/ प्र.क्रं. १०६४/२०११/१६-ब दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकावर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक २५.८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सव्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एस.एल.पी. मधील आदेशाच्या अधिन राहुन नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासुन ६ महिन्याचे आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा सेवा समाप्त करण्यांत येईल.

(८) महाराष्ट राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रीमिलेयर) तत्व वि.जा.(अ), भज(ब), भज(क), भज(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासप्रवर्ग यांना लागु आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१.३.२०१३ पर्यतचे ग्राहय असल्याबाबतचे नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

(९) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/२००१ मसेआ २००० प्र.क्रं. ४१५ का-२ दिनांक २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट या मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(१०) सामान्य प्रशासन विभागाचे अधिसुचना क्रं. एसआरव्ही २००/ प्र.क्रं. १७(२०००) दि. २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक क्रमांक एस.आर.व्ही. २०००/प्र.क्रं. १७/२०००/१२ दिनांक १ जुलै २००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे अर्जदाराने विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

(११) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची प्रत सादर करावी लागेल.

(१२) उमेदवार स्वातंत्र संग्राम सैनिकांचे पाल्य असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(१३) कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांचे संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास या बाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षणात बदल करणे, परिक्षेला स्थगीत करणे अथवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबतचे सर्व अधिकारी प्रशासनाने राखुन ठेवलेले आहेत. या बाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

(१४) नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर २००५ अनुसार लागु करण्यांत आलेली परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु राहील.

(१५) निवड प्रक्रीया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दवडून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल व त्यांचे विरूध्द नियमानुसार आवश्यक कारवाई केली जाईल.

(१६) सदरची पदे अस्थायी स्वरूपाची असुन शासनाच्या धोरणाअंती उमेदवारांची सेवा केव्हाही समाप्त करण्यांत येईल.

(१७) परीक्षेचा निकाल तयार करतांना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रनिम २००७/प्र.क्रं.४६/०७/ १३-अ दिनांक २७.६.२००८ मधील मुद्दा क्रमांक ६ मध्ये दिलेल्या निकषावर लावण्यांत येईल.

(१८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रं. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९/०३/२००३ नुसार गट-क संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाचे आत शासनाने ठरवून दिलेली संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहिल अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील.

(१९) उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

## (६) परीक्षेचे स्वरूप

| |
|---|
| **परीक्षेच्या स्वरुपाबाबत वेगळयाने प्रकटन केल्या जाईल.** |

## (७) अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक सुचना.

१) उमेदवाराची माहिती संगणकावर एकत्रीत करण्यांत येणार आहे. परिक्षेसाठी विहीत केलेला अर्ज www.washim.nic.in तसेच nppwashim.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. त्यावर असलेल्या अर्जात माहिती भरुन सादर करावा व प्रिंट आऊट काढून घ्यावी. इंटरनेटवर भरलेल्या अर्जाच्या माहितीची प्रत प्राप्त करून घेतल्यावर त्यावर स्वतःचा स्वसांक्षाकीत फोटो लावुन डी.डी.

सोबत **<u>अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी वाशिम</u>** ता.जि. वाशिम पीन कोड क्रमांक ४४४५०५ यांचे नावाने पाठवावा. तसेच डी.डी. च्या मागे स्वत:चे नाव, पोस्टाचा पत्ता, पदाचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा. तसेच अर्जासोबत अर्जात नमुद केलेल्या शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे डि.डि. सह या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२) उमेदवाराला कोणत्याही वेब सेंटरवर किंवा उपलब्ध असलेल्या कोणत्याही इंटरनेट सुविधा असलेल्या संगणकावरून अर्ज भरता येईल.

३) उमेदवारांनी माहिती भरण्यापूर्वी डिमांड ड्राप्ट तयार करून सोबत ठेवावा. म्हणजेच डी.डी. बाबतची माहिती आवेदन पत्रावर भरता येईल. त्याशिवाय ईटंरनेटवर अर्ज भरता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४) उमेदवारांनी डी.डी. योग्य ठिकाणचा काढला आहे किंवा नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. यासंबधात डी.डी. बॅकेने स्विकारला नाही तर उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यांत येईल.

५) परीक्षा प्रवेश पत्र आपणांस www.washim.nic.in तसेच nppwashim.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यांत येणार आहे. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपुन ठेवावा.

६) परीक्षा प्रवेश व इतर परिक्षेविषयी माहिती ही www.washim.nic.in तसेच nppwashim.in वर उपलब्ध राहील.

७) गुणानूक्रमे लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व निवड झालेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्राची तपासणी करण्यात येईल.

८) **परीक्षा शुल्क :**

वरील पदाच्या लेखी परीक्षेकरीता मागासवर्गीय उमेदवारांनी रूपये १००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रूपये २००/- इतके परीक्षा शुक्त अर्जासोबत भरावयाचे आहे. परीक्षा शुल्क डी.डी. (Demand Draft) स्वरुपात **<u>अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, वाशिम</u>** यांचे नावाने राष्ट्रीयकृत बॅकेंचा वाशिम येथे देय असलेला (Payble at washim) असणे आवश्यक राहील. सदर परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. परिपुर्ण अर्जासोबत परीक्षा शुल्क डी.डी. स्वरुपात जोडण्यांत यावा.

९) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही. परंतु अर्जात माजी सैनिक असा उल्लेख असणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार माजी सैनिक नसल्याचे आढळुन आल्यास अर्ज रद्द समजण्यांत येईल.

१०) **निवड पध्दत** :

उक्त पदाकरीता उमेदवाराची निवड लेखी परीक्षेत मिळणा-या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यांत येईल.

### -: भरती बाबत इतर आवश्यक सुचना :-

१) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२) निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहीत केलेल्या भाषा परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

३) नियुक्ती झालेनंतर उमेदवारांना मा. आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे आदेशास अधिन राहुन जिल्हयातील कोणत्याही नगर परिषदांमध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसाचे आत रुजु होणे आवश्यक राहिल.

४) आवेदन पत्र स्विकृत/अस्विकृत करण्यास निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल तसेच अंतीम निर्णय इत्यादी बाबतचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवड समिती/नियुक्ती प्राधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

५) विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवाराचे अर्ज, विहीत नमुन्यांत नसलेले अर्ज, मजकुर अपुर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, स्वाक्षरी नसलेले अर्ज, विहीत शुल्क न भरलेले अर्ज व फोटो नसलेले अर्ज, विहीत कालावधीत प्राप्त न झालेले अर्ज या प्रमाणे इतर उणिवा असलेले अर्ज नाकारण्यांत येईल.

दिनांक :- २१/१२/२०१२

**(मुळ प्रत मा.जि.अ.द्वारा अनुमोदीत.)**

**स्वा-**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी वाशिम करीता**

## जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

**सळसेवा भरती (संक्षिप्त) जाहिरात क्र.कक्ष-१३/अका (नपाप्र)/कावि-१३८०/२०१२**
**दि. २१/१२/२०१२**

जिल्हा निवड समिती, वाशिम मार्फत जिल्हाधिकारी वाशिम यांचे आस्थापनेवरील वाशिम जिल्हयातील नगर परिषदांमध्ये राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणी-क व श्रेणी-क-२ मधील रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामी पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन फक्त ऑन लाईन पध्दतीने दिनांक ०५.०१.२०१३ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत. रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव व वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता | भरावयाची एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) श्रेणी-क<br>वेतन श्रेणी - रुपये ९३००-३४८००/-<br>ग्रेड पे-४२००/- | (i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (बी.ई. सिव्हील) किंवा पदविका (डि.ई.सिव्हील) आवश्यक.<br>(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. | ३ |
| २ | अभियांत्रिकी सेवा (विद्युत) श्रेणी-क<br>वेतन श्रेणी - रुपये ९३००-३४८००/-<br>ग्रेड पे-४२००/- | (i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी (बी.ई. विद्युत) किंवा पदविका (डि.ई.विद्युत) आवश्यक.<br>(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. | ४ |
| ३ | अभियांत्रिकी सेवा (संगणक) श्रेणी-क<br>वेतन श्रेणी - रुपये ९३००-३४८००/-<br>ग्रेड पे-४२००/- | (i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (बी.ई. संगणक) किंवा पदविका (डि.ई. संगणक) आवश्यक.<br>(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. | ४ |
| ४ | जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा श्रेणी-क<br>वेतन श्रेणी - रुपये ९३००-३४८००/-<br>ग्रेड पे-४२००/- | (i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/पर्यावरण अभियांत्रिकी पदवी (B.E. Mechanical/ Environmental) किंवा यांत्रिकी/ पर्यावरण पदविका D.E. Mechanical/ Environmental) आवश्यक किंवा शासनमान्य विद्यापीठाची पर्यावरण विज्ञान (Environmental Science) या विषयातील पदव्युत्तर पदविका आवश्यक.<br>(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. | ६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | लेखा व लेखा परिक्षण सेवा श्रेणी-क<br>वेतन श्रेणी - रुपये ९३००-३४८००/-<br>ग्रेड पे-४२००/- | (i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी आणि Member of Institution of Cost and Works Accounts (I.C.W.A.) किंवा सनदी लेखापाल (Chartered Accountant) असणे आवश्यक.<br>(ii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. | १ |
| ६ | अग्निशमन सेवा श्रेणी-क-२<br>वेतन श्रेणी - रुपये ५२००-२०२००/-<br>ग्रेड पे-२८००/- | (i) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>(ii) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम (Sub Officers Course) उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>(iii) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>(iv) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. | २ |
| | | **एकुण** | **२०** |

उपरोक्त पदांसाठीची सविस्तर जाहिरात, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, सामाजिक व समांतर आरक्षण, विहीत शुल्क, अर्ज करावयाची पध्दत, विहीत महत्वाच्या दिनांक, परिक्षेबाबतची माहिती व इतर सुचना सविस्तरपणे वाशिम जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.washim.nic.in व nppwashim.in उपलब्ध आहे.

दिनांक :- २१/१२/२०१२

**(मुळ प्रत मा.जि.अ.द्वारा अनुमोदीत.)**

**स्वा-**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी वाशिम करीता**

## (६) परीक्षेचे स्वरूप

| अ. क्रं. | पदाचा संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | मौखिक परीक्षा | एकुण |
| १ | अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) श्रेणी-क | १८० | २० | २०० |
| २ | अभियांत्रिकी सेवा (विद्युत) श्रेणी-क | १८० | २० | २०० |
| ३ | अभियांत्रिकी सेवा (संगणक) श्रेणी-क | १८० | २० | २०० |
| ४ | जलदाय मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा श्रेणी-क | १८० | २० | २०० |
| ५ | लेखा व लेखा परिक्षण सेवा श्रेणी-क | १८० | २० | २०० |
| ६ | अग्नीशमन सेवा श्रेणी-क-२ | १८० | २० | २०० |

- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रनि.म.२००७/प्र.क्र.४६/०७/१३/अ दिनांक १९/१०/२००७ मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर मुलाखत घेण्यात येऊन अंतिम निवड करण्यात येईल.
- लेखी परिक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल. लेखी परिक्षा OMR पध्दतीने घेण्यात येणार आहे.
- लेखी परीक्षा
  भाग-१ : ५० प्रश्न (प्रती प्रश्न २ गुण, एकूण गुण १००) मराठी, इंग्रजी,सामान्य ज्ञान व बौध्दिक क्षमता चाचणी
  भाग-२ : ४० प्रश्न (प्रती प्रश्न २ गुण, एकूण गुण ८०) व्यावसायिक अभ्यासक्रमाशी संबंधीत
- मौखिक परीक्षा
  २० गुण मुलाखत

टिप : १. लेखी परीक्षेत भाग १ व भाग २ या दोन्हीमध्ये स्वतंत्रपणे ४५ % गुण मिळवणे आवश्यक राहील.

२. लेखी परीक्षेत ४५ % गुण (म्हणजेच भाग १ मध्ये किमान ४५ + भाग २ मध्ये किमान ३६ असे एकूण ८१ गुण) मिळविणाऱ्या उमेदवारालाच मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

३. लेखी परीक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणानुक्रमानुसार मुलाखतीसाठी एकूण उमेदवारांच्य ३ पटीत उमेदवार बोलाविण्यात येतील.

४. एखादा उमेदवार लेखी परीक्षेत अधिक गुण मिळवून देखील मुलाखतीला गैरहजर राहिल्यास त्याची नियुक्तीसाठी शिफारस करता येणार नाही. मात्र एखाद्या उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर अशा उमेदवाराशी शिफारस करण्यात येईल.